औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दिनांक २९.२.९२ रोजी झालेल्या ७१ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. श्री. ईश्वर भोसीकर | सभापती औरंगाबाद. मंडळ |
| २. श्री. विजय देशपांडे | उपसभापती, औरंगाबाद मंडळ. |
| ३. श्री. व्यकंटराव देशपांडे उर्फ बबरु चारठाणाकर | सदस्य |
| ४. श्री. दे. हि. मुन, उपसंचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण औरंगाबाद विभाग, औरंगाबाद. | सदस्य |
| ५. श्री. राजभोज, कार्यकारी अभियंता, म.न.पा.औ.बाद [आयुक्त म.न.पा. औरंगाबाद] यांचे | ---- सदस्य प्रतिनिधी |

विषय क्र. १: दिनांक ५.२.१९९२ रोजी झालेल्या ७० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ४२९

मंडळाच्या ७० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविण्यांत आला. विषय क्र. ३- ठराव क्र. ४२५ वर सविस्तर चर्चा करतांना उपसभापतींनी, मा. सभापतीचे निदर्शनास अशी बाब आणली की, पंचवटी नाशिक येथील उच्च उत्पन्न गट १८ गाळे व १६ दुकानांची योजना याच्या बांधकामाचे काम ठेकेदाराने पूर्ण करुन तदनंतर एक वर्ष पर्यन्त देखरेखीची जबाबदारी सांभाळून मंडळाकडे हस्तांतरीत केलेले होते. सदर देखरेखीचा खर्च कंत्राटदारास ठराव क्र. ३५१ अन्वये देय ठरतो. त्यामुळे ठराव क्र. ४२५ मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. मा. सभापतींनी त्यास मान्यता दिली.

" सुधारीत ठराव क्र. ४२५ असा वाचावा. "

ठराव क्र. ४२५

वरील विषयावरील बाब टिप्पणीवर विस्तृत चर्चा झाली १८ गाळे उच्च उत्पन्न गट गृहनिर्माण योजना हे एकरकमी पध्दतीवर वाटप करावयाचे होते.

..

व त्यामुळे सदरच्या गाळयास अल्प प्रतिसाद होता म्हणून बरेच दिवस वाटप होऊ शकले नाही. जवळच्या झोपडपट्टी वसाहतीमुळे गाळयांच्या खिडक्याच्या काचा फुटलेल्या आहेत. सदरील गाळयांच्या बांधकामाचे काम ठेकेदाराने पूर्ण करुन तद्नंतर एक वर्षापर्यन्त देखरेखीची जबाबदारी सांभाळून मंडळाकडे हस्तांतरीत केले. सदर देखरेखीचा खर्च कंत्राटदारास ठराव क्र. ३५१ अन्वये देय ठरतो. परंतु नंतरच्या काळात मंडळाकडून सदरील गाळयाचे संरक्षण होऊ शकले नाही. कारण मंडळाकडे राखण व संरक्षण करण्यासाठी कर्मचारी उपलब्ध नाही म्हणून या काळात ज्या ज्या ठिकाणी काचा फुटलेल्या आहेत त्या त्या ठिकाणी नविन काचा बसवून घेण्याचे काम ठेकेदाराकडूनच करुन घेतले होते. त्यामुळे सदरील जादा होणा-या खर्चाची परिपुर्ती ठेकेदारास करणे आवश्यक आहे व हे काम ठेकेदाराने गाळे वाटप करण्यापूर्वी करुन दिलेले आहे. म्हणून मंडळाने असा ठराव मंजूर केला की, खिडक्यांच्या फुटलेल्या काचा बदलुन नविन काचा बसविण्यासाठी झालेल्या खर्चाची अदायगी करण्यांत यावी. कार्यकारी अभियंता/नाशिक यांनी प्रत्यक्ष केलेल्या कामानुसारच देयक तपासून खर्चाची अदायगी करावयाची आहे'

व इतर विषयावर सविस्तर चर्चा होऊन दि. ५. २. १९९२ रोजी झालेल्या ७० व्या सभेचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: स. न. १२१ [हि] जालना येथील अल्प उत्पन्न गटातील ५७ गाळयांची योजना.

ठेकेदाराने योजनेतील गाळयांच्या राखण व संरक्षणावर केलेल्या खर्चाला मंजूरी देणेबाबत.

ठराव क्र. ४३०

वरील विषयावरील बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन ठेकेदाराने वरील योजनेतील गाळयांचे [१० इमारतीकरिता] राखण व संरक्षण केल्यामुळे, पहिले सहा महिने वगळून नंतरच्या फक्त सहा महिन्यापर्यन्तचे पैसे दोन चौकीदारासाठी रु. ८००/- प्रती माह प्रमाणे येणारी रक्कम संबंधीत ठेकेदारास अदा करण्यांत यावी असा ठराव मंडळाने मंजूर केला. परंतु ठेकेदाराच्या वरील गाळयाच्या राखण व संरक्षण कालामध्ये जर कांही नुकसान जसे खिडक्याचे काचा बदलणे, चोरीस गेलेले पाईप-फिटींग बदलून देणे, इत्यादी नुकसान भरपाईची जबाबदारी मात्र ठेकेदारावर टाकण्यांत यावी व तसे ठेकेदाराकडून लेखी स्वरुपात घ्यावे असे मंडळाने सुचविले.

विषय क्र. ३: लातूर येथील गृहनिर्माण योजना.

ठराव क्र. ४३१

उपरोक्त विषयावरील बाब टिप्पणीवर मंडळाने सविस्तर चर्चा केली व मंडळाने असा ठराव मंजूर केला की, लातूर येथे विविध योजनेतील गाळयासाठी अल्प प्रतिसाद असल्यामुळे ७.३.९२ ही अर्ज भरुन घेण्याची शेवटची तारीख एक महिन्यासाठी म्हणजेच ७.४.९२ पर्यन्त [अर्ज विकण्याची व स्विकारण्याची] मुदत वाढवावी.

तसेच मंडळाने असा ठराव मंजूर केला की, दि. ७.४.९२ [वाढीव तारीख] पर्यन्त जर लातूर येथील गाळयासाठी पुरेशी मागणी प्राप्त झाली तर गाळयांची गृहनिर्माण योजना राबवावी. अन्यथा अल्प प्रतिसादामुळे गाळयाच्या योजनेऐवजी, भूखंडाची योजना घेण्यांत यावी व तदनंतर भूखंडासाठी जाहिरात देण्यांत यावी.

विषय क्र. ४: असाधारण परिस्थितीत केलेल्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करणेबाबत.

ठराव क्र. ४३२

श्री. डी. टी. सानप, वरिष्ठ लिपिक यांची पत्नी दिनांक १५. १. ९२ ते २३. १. १९९२ पर्यन्त डॉ. अशोक बगडीया यांचे रुग्णालयात, बाळंतपणामध्ये स्त्रीरोग शास्त्र व प्रसुतीशास्त्र यांचेशी संबंधी असलेल्या आजारामुळे भरती झालेल्या होत्या त्या करिता त्यांना एकंदरीत रु. ३७२८/- खर्च झाला परंतु नियमानुसार मंजूर करता येण्या योग्य रक्कम रु. ३२७८/- श्री. सानप यांना अदा करण्यांत यावी असा प्रस्ताव मांडला होता. सदर प्रस्तावावर मंडळाने चर्चा करुन श्री. सानप यांनी खर्च केलेल्या रकमेपैकी रु. ३२७८/- अदा करण्यास मंडळाने मंजूरी दिली.

विषय क्र. ५: मा. सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

विषय क्र. १: जालना व लातूर येथे शासकीय कर्मचा-यांकरिता शासनाच्या छेद अंशदान योजने अंतर्गत सेवानिवासस्थाने बांधण्याबाबत.

ठराव क्र. ४३३

वरील विषयावर सविस्तर चर्चा करुन असा निर्णय घेण्यांत आला की, महाराष्ट्र शासनाच्या आठव्या पंचवार्षिक योजनेतील [वर्षे ९२-९७ ]

मसूदामध्ये शासनाच्या ठेव अंशदान[DEPOSIT CONTRIBUTION WORK) योजने अंतर्गत शासकीय कर्मचा-यांची सेवानिवासस्थाने बांधण्यासाठी [जालना ३४८ गाळे व लातूर २७८ गाळे रु.२.०० कोटीची तरतूद सन १९९२-९३ वर्षासाठी असल्यामुळे जालना येथे ३०० सेवानिवासस्थाने व लातूर येथे २०० निवासस्थाने बांधण्याचे काम शासनाकडून म्हाडास "एजन्सी बेसीस" मिळावे म्हणून प्राधिकरणास सविस्तर,प्रस्ताव तयार करुन शिफारशीसह पाठविण्यांत यावा. तसेच वरील काम "एजन्सी बेसीस" वर म्हाडास मिळावे म्हणून प्राधिकरणाकडे व शासनाकडे पाठपुरावा करावा, म्हणजे मंडळास पुढील भविष्यात काम उपलब्ध होऊ शकेल.

शेवटी मा.सभापतीच्या परवानगीने सभा संपली.

. . .